प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. 21.12.२०२०**

**राज्य शासनाच्या आवाहनास प्रतिसाद देत सिडको भवन येथे रक्तदान शिबिर संपन्न**

राज्यामध्ये निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा लक्षात घेता **श्री. उद्धव ठाकरे, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व श्री. राजेश टोपे, मा. आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य** यांच्या आवाहनास प्रतिसाद देत **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक** यांच्या अध्यक्षतेखाली व सिडको कर्मचारी संघटनेच्या सहभागाने सिडकोमध्ये दिनांक 21 डिसेंबर 2020 रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोविड - 19 संदर्भातील सर्व नियमांचे पालन करून हे रक्तदान शिबिर पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून 161 अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले.

सदर रक्तदान शिबिर जे. जे. रूग्णालय रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. ‘‘सध्याच्या कोविड - 19 च्या कठिण काळात रक्ताचा निर्माण झालेला तुटवडा भरून काढण्यासाठी सिडकोतर्फे लावलेला हा छोटासा हातभार आहे. लवकरच रक्तदान शिबिराप्रमाणेच प्लाझ्मा डोनेशनचे शिबिरदेखील आयोजित करण्याचा सिडकोचा मानस आहे’’, असे उद्गार या प्रसंगी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी काढले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी, सिडको**